प्रकरण १

# विकास प्रशासन

# (Development Administration)

१) विकासाची संकल्पना, २) विकासाचा अर्थ, ३) विकासाचा उद्देश, ४) विकास कार्यात शासनाची भूमिका, ५) विकास प्रशासन, ६) विकास प्रशासनाची संकल्पना, ७) विकास प्रशासनाचा अर्थ, ८) विकास प्रशासनाच्या व्याख्या, ९) विकास प्रशासन आणि पारंपरिक प्रशासन यातील भेद, १०) विकास प्रशासनाचे उद्देश, ११) विकास प्रशासनाची वैशिष्ट्ये, १२) विकास प्रशासनाची साधने, १३) विकास प्रशासनाची व्याप्ती, १४) विकास प्रशासनाचे स्वरूप, १५) विकास प्रशासनाची कार्ये, १६) विकास प्रशासनाचे महत्त्व, १७) लोकप्रशासन विकासाचे साधन म्हणून.

## विकासाची संकल्पना (The Concept of Development)

'विकास' हा शब्द अतिप्राचीन काळी होता, आधुनिक काळात आहे आणि भविष्यकाळातसुद्धा तो राहणार आहे. विकसनशील देशांसमोर ज्या समस्या असतात त्यात विकास घडवून आणण्याची समस्या ही एक प्रमुख समस्या असते. **सुसंस्कृत समाजाची एक महत्त्वपूर्ण आवश्यकता म्हणजे विकास होय.** मानवी सभ्यता व संस्कृतीमध्ये जो बदल घडतो किंवा जे परिवर्तन होत असते तो बदल अथवा परिवर्तन हा विकासाचाच भाग असतो. विकास हा एक सर्वव्यापी शब्द असून सर्वव्यापी घटनांचा त्यामध्ये समावेश होतो. आज संपूर्ण जग या विकासाच्या संकल्पनेने प्रभावित झालेले आहे. **विकास ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे.** सर्व देशकालपरत्वे ती अखंड चालणारी प्रक्रिया आहे. विकासासाठी जे प्रयोग प्राचीन काळात केले गेले त्यांचा लाभ कमी अधिक झाला असेल, म्हणून बदलत्या काळात बदलते प्रयोग केले जात असतात. त्यांचे परिणाम निराशाजनक असोत अथवा अनुत्पादक असोत विकासाचे प्रयोग होत राहिले हे मानवजातीच्या इतिहासावरून स्पष्ट होते. **विकासाच्या प्रक्रियेतून कोणीही सुटू शकत नाही.** विकास म्हणजे जनतेचा विकास अशा अर्थानेच ही संकल्पना वापरली जाते. विकासाची संपूर्ण जबाबदारी ही प्रशासनाची असते. विकासाचा मुख्य उद्देश लोकांची भौतिक आणि आध्यात्मिक प्रगती करण्यासंबंधी असतो. या दोन्ही गोष्टींमध्ये परिपूर्णता प्राप्त व्हावी हा हेतू ठेवूनच विकासाची प्रक्रिया घडत असते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे विकासाचे एक स्वरूप म्हणजे परिवर्तन होय. परिवर्तन दोन प्रकारचे असते. एक सकारात्मक परिवर्तन आणि दुसरे नकारात्मक परिवर्तन.

मोठी फलश्रुतीदेखील प्राप्त झाली. वैज्ञानिक व्यवस्थापनामध्ये साधन आणि सामग्रीकडे विशेष लक्ष पुरविले गेले. उद्देश वा ध्येये यांच्या विश्लेषणाकडे विशेष लक्ष दिले गेले नव्हते. कार्यकुशलता यालाच ध्येय मानले गेले. तेच साधन आणि साध्य समजले गेले. या दोन्हीमधला भेद नष्ट झाला. ध्येयाच्या प्राप्तीकडे कमी लक्ष दिले गेले. उद्देशांना महत्त्व देण्याऐवजी साधनांना महत्त्व दिले गेले. प्रशासकीय सिद्धांतानुसार यामधील जी बाब लोप पावू लागली होती तिला उजागर करण्याचा प्रयत्न **एडवर्ड डब्ल्यू. वीडनर** यांनी विकास प्रशासनाची संकल्पना मांडून पूर्ण केली. विकास प्रशासन ही मूलत: लोकप्रशासनाचीच संकल्पना असून ती कृतीअभिमुख (action oriented) आहे. विकास प्रशासन ही संरचना अभिमुख (Structure oriented) संकल्पना नाही. संरचनेमधील बदल हा कृती अभिमुखतेच्या परिणामस्वरूप असतो. व्यापक अर्थाने **वीडनर** असे म्हणतात की, विकास प्रशासन हे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टांची प्राप्ती करणाऱ्या संघटनांना मार्गदर्शन करते. ते प्रशासन प्रामुख्याने कार्यान्मुख पद्धतीवर भर देते. विकासशील देशात विकास प्रशासनाला एवढे महत्त्व प्राप्त झाले आहे की तेथील प्रशासकीय संरचना, संघटना, धोरणे, योजना, कार्यक्रम इत्यादी बाबींना विकासात्मक उद्देशांच्या स्वरूपातच स्वीकारले जाते. विकासशील देशांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय तंत्रांच्या विकासासाठी विकास प्रशासन हे कार्यरत असते. यामुळे परंपरावादी प्रशासनाला विकास प्रशासनाचा वेष परिधान करावा लागत आहे. हा विकास प्रशासनाचा प्रभावच म्हणावा लागेल. म्हणून लोकप्रशासन शास्त्रात विकास प्रशासनाचा स्वतंत्र अभ्यास करणे क्रमप्राप्त बनते. **वीडनर** यांनी विकास प्रशासनाची ही संकल्पना प्रस्तुत केली आणि **फ्रेड डब्ल्यू. रिग्जने** या संकल्पनेला वास्तविक स्वरूप प्रदान केले. **रिग्जने** विकास प्रशासनाला विशिष्ट पद्धतीने सादर करण्याचा प्रयत्न केला. त्याचा हा प्रयत्न आणि प्रयोग लोकप्रशासनात विशेष स्थान आणि मान प्राप्त करून आहे.

### विकास प्रशासनाचा अर्थ
### (Meaning of Development Administration) :

विकास प्रशासनाचा मुख्य उद्देश हा आहे की, लोकप्रशासनाने सामाजिक आणि आर्थिक ध्येये प्राप्त करावीत. विकास प्रशासनाच्या रचनेचा आणि निर्मितीचा हेतू सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणणे हाच आहे. हे परिवर्तन सकारात्मक असावे ही अपेक्षा त्यामागे असतेच. लोककल्याण साध्य करणे त्यामागचा कायमचा हेतू असतो.

जी राष्ट्रे विकास घडवून आणण्याच्या प्रयत्नाला लागली ती राष्ट्रे विकसनशील राष्ट्रे म्हणून संबोधली जाऊ लागली. विकसनशील राष्ट्रातील प्रशासनाला 'विकास

(4)

**मर्ले फेन्सोड म्हणतात** - "विकास प्रशासन हे नवीन जीवन मूल्यांचे वा आहे." या विकास प्रशासनात विकसनशील देशांनी आपले आधुनिकीकरण आ औद्योगिकीकरण करून घेण्यासाठी स्वीकार केलेल्या अनेक नवीन कार्यांचा समावेश करण्यात येतो. विकास प्रशासनाचा संबंध सर्वसाधारणत: नियोजित आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या नवीन प्रशासकीय यंत्रणेशी असतो. राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यासाठी राष्ट्रातील साधनसामग्रीचा पुरेपूर उपयोग करण्याच्या प्रक्रियांशी असतो.

**प्रा. पॉल मिडॉस (Prof.** Paul Meadows) विकसनशील देशात आर्थिक आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या राष्ट्रीय धोरणाच्या सार्वजनिक व्यवस्थापनाला विकास प्रशासन असे म्हणता येईल. विकास प्रशासनाचा संबंध बदल करण्यासाठी आवश्यक असलेल्या मार्गदर्शनात्मक कार्याशी असतो.

(Development Administration can be regarded as the public management of economic and social change in terms of deliberate public policy. The development administration is concerned with guiding the change.)

**एफ. डब्ल्यू. रिग्ज म्हणतात** की, विकास प्रशासन हे प्रशासकीय समस्या आणि शासनाची सुधारविषयक कार्ये यांच्याशी निगडित असते.

**डोनॉल्ड सी. स्टोन्स** (Donald C. Stones) सामान्यपणे विकास प्रशासनाचा संबंध हा राष्ट्रीय विकासपूर्ती करण्याशी असतो. त्याचप्रमाणे निर्धारित ध्येय वेळेच्या आत पूर्ण करून घेण्याशी विकास प्रशासनाचा संबंध येतो.

**जॉन डी. मॉण्टगोमेरी** म्हणतात की, विकास प्रशासनाचा संबंध अर्थव्यवस्था आणि काही मर्यादेपर्यंत सामाजिक सेवांमध्ये नियोजनपूर्ण परिवर्तन आणण्यासंबंधी असतो.

**प्रा. व्ही. जगन्नाथम्** म्हणतात, विकास प्रशासन ही एक प्रक्रिया आहे. ती पूर्व निर्धारित उद्देशांची प्राप्ती करण्यासाठी क्रियान्वित असते. त्यामध्ये धोरण, योजना, कार्यक्रम इत्यादी गोष्टींचा समावेश असतो.

**प्रा. ब्रान्ड स्काफर** विकास प्रशासनाचा अर्थ स्पष्ट करताना सार्वजनिक धोरण निर्मिती आणि त्याची अंमलबजावणी यावर अधिक भर देतात.

**प्रा. मोहित भट्टाचार्य** म्हणतात की, विकास प्रशासन विकसनशील देशाची प्रशासकीय विचारप्रणाली असते.

(Development Administration is an administrative ideology of developing Countries)

काही लेखकांनी नियोजित परिवर्तनाच्या प्रशासनाला विकास प्रशासन असे म्हटले

आर्थिक विकास करणे हाच असतो. आपल्या अभ्यासाच्या दृष्टीने विकास प्रशासनाचे उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) विकाससंबंधीचे धोरण आणि उद्दिष्टे यांचे सुसूत्रीकरण करणे.
२) कार्यक्रम आणि प्रकल्प यांचे व्यवस्थापन करणे.
३) प्रशासकीय संरचना आणि प्रक्रिया यांच्यात परिवर्तनान्मुख पुनर्गठन करणे.
४) विकासाच्या कार्यात जनतेच्या सहभागासाठी प्रयत्न करणे.
५) सामाजिक, आर्थिक आणि राजकीय संरचनेची प्रगती करणे.
६) उद्दिष्टांची प्राप्ती व त्यांचे मूल्यांकन करणे.
७) आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक साधनांचा वापर करणे.
८) विकास कार्याद्वारे सामान्याला न्याय मिळवून देणे. समाजातील उपेक्षित घटकांकडे विशेष लक्ष देणे. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.

वरील उद्देश प्राप्त करण्यासाठी महसूल विभाग, कायदा आणि सुव्यवस्था विभाग आणि विकास अभिकरणे (Agencies) मदत करतात. या घटकांचे सहकार्य प्राप्त करून घेण्यासाठी प्रत्येक विकसनशील देश प्रयत्न करत असतो. विकास प्रशासनाच्या कार्यांना प्राधान्यता दिली जाते.

**विकास प्रशासनाची वैशिष्ट्ये :**

विकास प्रशासनाची वैशिष्ट्ये अभ्यासल्यानंतर ही संकल्पना अधिक स्पष्ट होईल. विकास प्रशासनाची संकल्पना विकसित करण्यामध्ये अमेरिकन विचारवंतांना अधिक श्रेय द्यावे लागते. **एडवर्ड वीडनर** हे त्यामध्ये प्रमुख आहेत. त्यांनी विकास प्रशासनाला प्रक्रियान्मुख आणि लक्ष्योन्मुख प्रशासकीय तंत्राच्या स्वरूपात मानले आहे. दुसरे विचारवंत **प्रा. फ्रेड डब्ल्यू. रिग्ज** आहेत. त्यांनी विकास प्रशासनात प्रशासकीय सुधारणा आणि शासन व्यवस्थेतील सुधारणा अशा दोन्ही सुधारणांचा समावेश केला आहे.

कोणताही विकास साध्य करावयाचा झाल्यांस प्रशासकीय व्यवस्था अधिक कार्यक्षम बनविली पाहिजे. विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कुशल प्रशासकवर्गाची नितांत गरज असते. त्यासाठी नियोजनाची प्रक्रिया स्वीकारावी लागते. विकास प्रशासनाची वास्तविक विशेषता पाहू लागल्यास त्यामध्ये धोरण, नियोजन, कार्यक्रम, प्रकल्प इत्यादी गोष्टींचा समावेश झालेला असतो. किंबहुना विकास प्रशासन हे या गोष्टींशीच संबंधित असते.

विकास प्रशासनाच्या संकल्पनाचे खरे स्वरूप व खरा अर्थ पाहत गेल्यास विकास प्रशासन हे जनतेसाठी असते, जनतेच्या विकासासाठी असते; परंतु जनतेबरोबर कार्य करणारे प्रशासन असते, हा त्यातील गर्भित अर्थ लक्षात घेतला पाहिजे. विकास प्रशासन हे शासनाचे कार्यात्मक स्वरूप आहे. त्या कार्यात्मक स्वरूपाचा वापर

करणारी, जबाबदारी पेलणारी व्यवस्था हीच प्रशासकीय यंत्रणा असते व ती सुव्यवस्थितप कार्यरत असणे आवश्यक असते.

**२) राजकीय संघटना** - राजकीय संघटना विकास कार्ये पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करत असतात. राजकीय संघटनांनी विकास कार्याचे समर्थन जर केले नाही तर ती विकास कार्ये संपन्न होणे अवघडच असते. चांगली राजकीय संघटना ही विकास प्रशासनाचा मार्ग खुला करू शकते. ती तो मार्ग विस्तारू शकते. ती तो मार्ग लांबवर नेऊ शकते. समर्थ व निःस्वार्थी राजकीय संघटना विकास प्रशासनाला बळकटी देऊ शकतात.

**३) स्वयंसेवी अभिकरणे किंवा संस्था** - शासनव्यवस्था जनतेच्या सर्वच अपेक्षांची पूर्तता करू शकत नसते. काही अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी स्वयंसेवी संघटना निर्माण होतात. त्या संस्था विकास प्रशासनाची कार्ये करण्यासाठी आपले पाठबळ पुरवितात. विकासाची कार्ये गतिशील करावयाची झाल्यास स्वयंसेवी संघटनांचा फार मोठा आधार मिळतो. स्वयंसेवी संघटनांचे ध्येय व उद्दिष्ट उच्च असल्यामुळे अत्यंत तळमळीने विकासाची कार्ये करण्यासाठी अशा संस्था पुढे सरसावतात.

**४) जनसंघटन** - विकास प्रशासन विकास कार्यक्रम अथवा विकास प्रकल्प राबविताना जनतेच्या सहभागावर अधिक जोर देते. जनसहभाग हे सुसंघटित समाजरचनेतच आढळून येते. जनतेला संघटित ठेवण्याचे कार्य जनतेचे प्रतिनिधी करत असतात. चांगले प्रतिनिधी असतील तर समाजदेखील चांगल्या प्रकारे संघटित केला जाऊ शकतो. चांगला संघटित समाज आणि प्रशासन यांच्या सहकार्याने विकासाच्या अनेक समस्यांवर मात करता येते.

जनसंघटनेतून जनसहभाग वाढतो. जनसहभागामुळे विकास प्रशासनालादेखील नवी दिशा प्राप्त होते. जनसहभागामुळेच काही दुर्बल घटकांचे सबलीकरण होते. चांगल्या जनसंघटनेमुळे शासनाला जनसंपर्क चांगला ठेवता येतो. जनसंपर्क चांगला असेल तर अनेक समस्यांचे सहज निराकरण होते.

वरील चार साधने विकास प्रशासनाची प्रमुख साधने आहेत. इतर काही साधनांचा समावेश उपरोक्त साधनातच होतो.

## विकास प्रशासनाची व्याप्ती
## (Scope of Development Administration) -

मागे विवेचन केल्याप्रमाणे विकास आणि प्रशासन या दोन्हीही संज्ञाचा अर्थ अत्यंत व्यापक असून दोहोंची क्षेत्रेदेखील विस्तृत आहेत. विकास आणि प्रशासन या दोन्ही संज्ञांचे एकत्रित रूप विचारात घेतल्यास त्याचे क्षेत्र अत्यंत व्यापक असणार हे स्पष्ट होते. विकास प्रशासन ही लोकप्रशासनाची नवीन शाखा आहे. या शाखेची

उत्पत्ती विकसनशील देशांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, प्रशासकीय इत्यादी क्षेत्राचा विकास करण्यासाठी झाली आहे. परिवर्तन घडवून आणणारे नियोजन, कार्यक्रम प्रकल्प इत्यादी लागू करण्याच्या संदर्भातील सर्व प्रकारचे प्रशासन हे विकास प्रशासनाच्या सदराखाली मोडते. विकासाची धोरणे आणि त्यासंबंधीच्या निर्णय प्रक्रियांचा संबंधदेखील विकास प्रशासनाशीच असतो. त्यामुळे विकास प्रशासनाच्या व्याप्तीचा विचार करताना त्यांचाही विचार करावा लागतो. विकासासाठी लागणाऱ्या संघटनात्मक संरचनेंचादेखील त्यामध्ये समावेश होतो. विकासात्मक सर्व क्रिया व सर्व घडामोडींचा समावेश विकास प्रशासनातच करावा लागतो.

आधुनिक काळात विकास प्रशासनाच्या वाढत्या कार्यामुळे त्याची व्याप्तीदेखील व्यापक बनली आहे. विकसनशील देशाच्या विकास प्रशासनाच्या व्याप्तीमध्ये पुढील बाबींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

१) आर्थिक विकासासाठी निर्माण करण्यात आलेले प्रशासन.
२) सामाजिक आणि सांस्कृतिक विकासासाठी निर्माण करण्यात आलेले प्रशासन.
३) विकास कार्यांसाठी स्थापन केलेल्या विविध प्रशासकीय संघटना. (उदा. नियोजन आयोग, पंचायतराज संस्था, औद्योगिक विकास महामंडळे इत्यादी)
४) विकास प्रशासनात कार्य करणाऱ्या कर्मचारीवर्गाचे व्यवस्थापन.
५) विकास प्रशासनासमोर येणाऱ्या अनेक अडचणी आणि त्या अडचणीतून काढावयाचे मार्ग हादेखील विकास प्रशासनाचा अभ्यास विषय बनतो.
६) विकास प्रशासन आणि जनता यांच्यातील संबंध

इत्यादी विषयांचा अभ्यास विकास प्रशासनात केला जातो. त्यामुळे विकास प्रशासनाची व्याप्ती विस्तारली जात असल्याचे दिसते.

असेही म्हटले जाते की, विकसनशील राष्ट्रातील सर्वच प्रशासन हे विकास प्रशासनच असते. विकास प्रशासनात सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, आर्थिक, औद्योगिक इत्यादी क्षेत्रासंबंधीच्या सर्वच विकासविषयक घडामोडींचा समावेश होतो. या सर्वच क्षेत्रातील कार्य शासनाकडून संचालित होते. विकास प्रशासनाच्या उपलब्ध साहित्यामध्ये विकास प्रशासनाचा अर्थ दोन प्रकारे सांगितलेला आहे. १) विकासाच्या कार्यक्रमांच्या स्वरूपातील प्रशासन व्यवस्था आणि २) प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना विकास प्रशासनानेच संबोधले जाते. यातून हेच स्पष्ट होते की विकास प्रशासनात त्या सर्व बाबींचा समावेश होतो, ज्या बाबी विकासाच्या कार्यक्रमांशी, योजनांशी, धोरणांशी संबंधित असतात. त्याचबरोबर प्रशासनासमोरील विविध समस्या सोडविण्यासाठी आपली क्षमता वाढविण्यासाठी आपली कार्यकुशलता वाढविण्यासाठी विकास प्रशासन प्रयत्न करत असते. यामुळे

असावे लागते. त्यामुळे त्याचे स्वरूप एक **प्रयत्नवादी** प्रशासन व्यवस्था असेही [म्हटले] जाते. विकास प्रशासन पुरोगामी स्वरूपाचे **असते** ही गोष्ट नि:संदेहपणे स्वीकार[ावी] लागते. उदयोन्मुख राष्ट्रांचे कार्योन्मुख आणि **लक्ष्योन्मुख** स्वरूपाचे विकास प्रशास[न] असते. विकास प्रशासन ही एक अखंड **चालणारी** प्रक्रिया असल्यामुळे ते निरं[तर] स्वरूपाचे प्रशासन असते. हे त्याचे सत्य **स्वरूपच** हे विकसनशील देशांना नवी[न] दिशा देण्यास समर्थ बनले आहे.

विकास प्रशासनाचे स्वरूप स्पष्ट करताना असे म्हणता येते की, विकास हे अंतहीन आहे. अशा अनंत स्वरूपाच्या विकास **प्रशास**नाला अनेक घटकांची मदत घेऊन सतत प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर व्हावे लागते.

**विकास प्रशासनाची कार्ये :**

विकास प्रशासनाची ध्येये आणि उद्दिष्टे लक्षात घेतल्यानंतर त्याची काही महत्त्वाची कार्ये पाहू या. सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचा वसा घेतलेल्या विकास प्रशासनाला पुढील कार्ये करावी लागतात. विकसनशील देशातील बदल घडवून येत असताना एक संक्रमण अवस्था असते. त्या संक्रमण अवस्थेतदेखील काही जबाबदारी विकास प्रशासनाला पार पाडावी लागते.

१) **सुव्यवस्था आणि सुरक्षितता** - आपल्या देशातील विकासासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या साधनसामग्रीची सुरक्षितता ठेवणे आणि त्याचसाठी आवश्यक असलेली सुव्यवस्था राखणे.

२) **राजकीय अधिमान्यता** - विकास कार्यांना राजकीय अधिमान्यता असावी लागते. जनतेची विश्वासार्हता विकास कार्यांना प्राप्त होणे आवश्यक असते. त्यासाठी राज्यसत्तेने त्या कार्यांना मान्यता देणे आवश्यक असते.

३) **समन्वय प्रस्थापित करणे** - विकासाची कार्ये सर्व आघाडीवर केली जात असल्यामुळे त्या सर्व कार्यात समन्वय प्रस्थापित करणे आवश्यक असते.

४) केंद्र, राज्य व स्थानिक स्वशासन यांच्याकडे विकासाची कार्ये सुपूर्द करताना त्यांचे योग्य वाटप होण्याकडे लक्ष पुरविणे.

५) सामाजिक हितसंबंधाचे अडथळे दूर करणे. विकासाद्वारे सामाजिक न्याय प्रस्थापित करणे.

६) नवीन तंत्रज्ञान आणि कार्यकुशलतेचा अवलंब करणे. आज सर्वच क्षेत्रासाठी (शेती, उद्योग, व्यापार इत्यादी) याची आवश्यकता आहे.

७) **भावनिक ऐक्य निर्माण करणे** - विकासाची कार्ये करत असताना सामाजिक विघटन होण्याचे प्रसंग टाळले पाहिजे. त्यासाठी विकासाची शिदोरी सर्वांच्या पदरात कशी पडेल याचे व्यवस्थित ज्ञान संबंधिताना करून दिले पाहिजे.

८) आधुनिकीकरणाचा स्वीकार करणे.

९) विकास प्रशासन हे नियोजनबद्ध असलेच पाहिजे. नियोजनासाठी सर्वच स्तरांवर योग्य यंत्रणेची उभारणी केलीच पाहिजे.

१०) आंतरराष्ट्रीय क्षेत्रातून सहकार्य प्राप्त करणे आणि आपले सहकार्य त्यांना देणे याकडे लक्ष पुरविणे.

११) विकसनशील देशासमोर वित्ताची सर्वात मोठी समस्या असते. वित्त पुरविण्यासाठी भांडवल उभारणी करण्याचे विविध उपाय शोधणे आणि विकास कार्यांना वित्तपुरवठा करणे.

विकास प्रशासनाची व्याप्ती लक्षात घेतल्यास विकास प्रशासनाच्या कार्याचे क्षेत्र किती व्यापक आहे हे स्पष्ट होईल. विकासाची कार्ये नेहमीच चालणारी असतात. त्यामुळे एक सतर्क प्रशासकीय व्यवस्था उभारणे आवश्यक असते. विकासातील अडचणींना योग्य प्रकारे तोंड देण्याचे कार्य अशी व्यवस्था करू शकते. त्याचप्रमाणे संकटे कोसळल्यानंतर त्या संकटाचे निवारण करून विकास कार्यांचा गाडा पुढे चालविणे विकास प्रशासनाचे कार्य आहे.

### विकास प्रशासनाचे महत्त्व
### (Significance of Development Administration)

लोकप्रशासनाप्रमाणेच विकास प्रशासन आधुनिक काळातील एक महत्त्वपूर्ण विषय आहे. याच्या अभ्यासाची गरज वाढली आहे. विकास प्रशासन विकसनशील राष्ट्रांच्या विकासाचा आधारस्तंभ बनला आहे.

लोककल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारलेल्या देशात विकास प्रशासनाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले आहे. जनसामान्यांच्या आशा आकांक्षा वाढल्यामुळे प्रशासनाकडून त्यांची पूर्तता व्हावी ही अपेक्षा असते. प्राचीन काळात मनुष्याच्या गरजा कमी असत त्यामुळे राज्याकडून केलेल्या अपेक्षाही कमी असत त्याचा परिणाम असा होता की राज्याची कार्ये मर्यादित असत. आज याच्याविरुद्ध चित्र दिसते.

विकासाची कार्ये हाती घेतल्यास त्यासाठी लागणारी यंत्रणा ही सर्वत्र सारखी असू शकत नाही. त्यामुळे विकासात्मक कार्याच्या स्वरूपात ती प्रशासकीय यंत्रणा उभारावी लागते. विकासाची कार्ये एका विशिष्ट पद्धतीनेच पूर्ण केली जाऊ शकतात. आज विकास प्रशासनासाठी नवीन प्रारूपे (Models) उदय पावली आहेत. संघटनात्मक दृष्टीने पाहिल्यास नवनवीन अभिकरणे विकासासाठी स्थापित करण्यात आली आहेत.

विकास प्रशासनाची ही ज्ञानशाखा जलद गतीने विस्तारली जात आहे. पाश्चात्य देशातून स्वतंत्र संस्था स्थापन करून याचा अभ्यास केला जात आहे. अनेक विद्यापीठांतून आणि महाविद्यालयांतून याचा अभ्यास आणि संशोधन केले जात आहे. विकास प्रशासनाला महत्त्व प्राप्त होणारी काही कारणे खालीलप्रमाणे आहेत.

त्या कारणांमुळे विकास प्रशासनाची आवश्यकता निर्माण झालेली आहे. विकास प्रशासनाला त्यामुळे आधुनिक काळात अधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.

**१) राज्याचे बदलते स्वरूप -**

राज्याचे स्वरूप बदलले आहे. प्राचीन काळातील राज्ये पोलिस राज्य होती. जनतेचे संरक्षण आणि कायदा आणि सुव्यवस्था राखणे इतपतच राज्याची जबाबदारी सीमित होती. आज राज्य लोककल्याणकारी राज्य म्हणून समजले जाते. लोककल्याणकारी राज्यात केवळ संरक्षणात्मक कार्ये करून आणि कायदा व सुव्यवस्था राखून काम भागत नाही, तर आधुनिक गरजांची विशेष करून भौतिक गरजांची पूर्तता राज्याने करावी अशी राज्याबद्दलची अपेक्षा असते. लोककल्याणाच्याही पुढे एक पाऊल पडले आहे. त्यामुळे प्रशासन व्यवस्थेची जबाबदारी वाढली आहे. या जबाबदारीमुळे राज्याचे स्वरूप प्रशासकीय राज्य असे बनले आहे. अशा प्रशासनाच्या राज्यात विकास प्रशासनाला महत्त्व हे येणारच. प्रशासकीय राज्याचा अर्थ असा घ्यायचा की, कोणतेही कार्य शासनानेच करावयाचे असते. स्थानिक शासन, राज्यशासन किंवा केंद्रशासन अशा विविध स्तरावरील शासनाने जनतेच्या दिमतीला राहावे अशी अपेक्षा केली जाते. घरांसमोरील स्वच्छतेपासून त्यांच्या मलमूत्र विसर्जनाचे नि:सारण करण्याची जबाबदारीही प्रशासनाचीच आहे. अशा प्रकारच्या प्रशासकीय राज्यात जनतेच्या वाढलेल्या आशा आकांक्षाची पूर्तता करण्यासाठी विकास प्रशासनाला महत्त्व प्राप्त होणे अपरिहार्य आहे.

**२) उदयोन्मुख राष्ट्राची शोचनीय स्थिती -**

आज तिसऱ्या जगातील राष्ट्रांची स्थिती अत्यंत शोचनीय आहे. विकासासाठी आसुसलेल्या राष्ट्रांना दीर्घकाळ सोसलेल्या हालअपेष्टांतून मुक्तता व्हावी असे वाटल्यास नवल नाही. पारतंत्र्यातून बाहेर पडलेल्या राष्ट्रांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती अत्यंत शोचनीय आहे. शैक्षणिकदृष्ट्या आणि औद्योगिकदृष्ट्या एवढे मागासलेपण आहे की, सुधारणा करण्यासाठी अनेक समस्यांशी सामना करावा लागणार असल्याचे चित्र आहे. अशा राष्ट्रांसमोर विकास साधण्याच्या या आशेच्या किरणासाठी विकास प्रशासन हे एकमेव साधन असल्याचे दिसते. पारतंत्र्यात असल्यामुळे त्यांचे आर्थिक शोषण झालेले आणि सामाजिकदृष्ट्या काही लोकच पुढारलेले त्यामुळे या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग नवीन शासनाला मिळणे आवश्यक होते. ते साधन विकास प्रशासनाच्या रूपाने त्यांना प्राप्त झाले. यामुळे विकास प्रशासनाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**३) सामाजिक कुरीती आणि वाईट प्रथा नष्ट करणे -**

अविकसित देशात आणि जे विकास पथावर आहेत त्या देशातून अनेक सामाजिक वाईट चालीरीती प्रचलित आहेत. अज्ञान, अंधश्रद्धा, पारंपरिक विचारांची कट्टरता, बेकारी

अशा अनेक वाईट गोष्टींना समजातून नष्ट करणे म्हणजे विकास करणे होय. विकसनशील राष्ट्रांना अशा प्रकारची प्रशासन व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. जेणेकरून त्यांना या वाईट प्रथा नष्ट करता येतील आणि सामाजिक परिवर्तन करून सुधारणा घडवून आणता येतील. यासाठी विकासात्मक प्रशासनाची आवश्यकता निर्माण झाली.

### ४) पुरोगामी विचारांना वाव देणे -

विकासासाठी प्रगतिशील विचारांची गरज असते. परंपरांना घट्ट चिकटून बसलेल्यांना विकास साधता येत नसतो. विचारांत परिवर्तन आणल्याशिवाय आचरणात परिवर्तन येत नसते. विकास साधण्यासाठी नवीन योजना, कार्यक्रम, प्रकल्प इत्यादी राबविणे आवश्यक असते. यासाठी पुरोगामी विचारांची गरज असते. विकास प्रशासनामुळे सामाजिक जागृती होऊन नवीन कार्यांच्या अंमलबजावणीमध्ये लोकांचे सहकार्य मिळू शकते. परिवर्तनाची भूक भागविण्याचे कार्य विकास प्रशासन करू शकते.

### ५) अयोग्य व प्रचलित प्रशासकीय यंत्रणा -

साधारणपणे विकसनशील राष्ट्रांची प्रशासकीय यंत्रणा विकास कार्यांचा भार झेपणारी नसते. कार्यकुशलतेचा अभाव असतो. शासनाची वाढती जबाबदारी पेलण्यासाठी प्रचलित प्रशासकीय यंत्रणा असमर्थ असते. नोकरशाहीचे अनेक दोष त्यामध्ये विद्यमान असतात. या संपूर्ण दोषातून मुक्त होण्यासाठी नवीन प्रशासकीय यंत्रणेची उभारणी होणे आवश्यक असते. विकास प्रशासनामुळे नवीन यंत्रणा अस्तित्वात येते. त्यामुळे नवीन कार्यक्रम, योजना यांची अंमलबजावणी केली जाऊ शकते. यामुळे आधुनिक काळात विकास प्रशासनाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

### ६) आर्थिक विकास -

प्रामुख्याने आर्थिक विकासासाठी विकास प्रशासनाची आवश्यकता असते. विकसनशील देशातील समाजाचा विकास करायचा म्हणजे तेथील जनतेला आर्थिक सुदृढता प्राप्त करून देणे होय. याचा अर्थ प्रत्येकाच्या मूलभूत गरजांची पूर्तता करणे होय. बेकारी नष्ट करणे आणि प्रत्येकाला कामाची संधी प्राप्त करून देणे ही सर्वात कठीण समस्या आहे. उत्पन्नाची साधने वाढविण्याशिवाय हे शक्य नसते. यासाठी नियोजनाची गरज असते. आर्थिक नियोजन करून आर्थिक विकास साधता येतो. गरिबी आणि बेकारी दूर करता येते. ही कार्ये टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाऊ शकतात. आर्थिक विकासासाठी प्रगत तांत्रिक ज्ञानाचा वापर करता येतो. औद्योगिक विकास करून नवनवीन उद्योगधंद्यांना चालना देता येते. विकासाचा वेग वाढविता येतो; परंतु काही कारणांमुळे उदा. लोकसंख्यावाढीमुळे विकासाचा वेग कमी होतो अथवा विकास खुंटतो. अशावेळी लोकसंख्यावाढीला आळा घालण्याचे कार्यदेखील करणे गरजेचे असते. विकास प्रशासनाला अशा बाबींकडेही लक्ष द्यावे लागते.